!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

शिवसेना

जा.क्र. : खा.का.प्र.प ४२१ २८/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# अर्धवट कामे करणाऱ्या बी.व्ही.जी कंपनीची चौकशी करा विद्युतीकरणाच्या बैठकीत खासदार चंद्रकांत खैर यांचे महावितरणला आदेश

**संभाजीनगर,ता.२८:** महावितरणचे ग्रामीण भागात अनेक कामे अर्धवट अवस्थेत आहेत. हे कामे करणाऱ्या ठेकेदारांचे काम कसे चालते यासाठी एक नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करा. कामे न करणाऱ्या बी.व्ही.जी आणि इतर ठेकेदारांची चौकशी करा असे स्पष्ट आदेशच खासदार चंद्रकांत खैरे यांनी विद्युत भवन येथे पार पडलेल्या विद्युतीकरणाच्या बैठकीत महावितरणच्या अधिकऱ्यांना दिले. पैठणच्या एमआयडीसीत विद्युत चोरीच्या घटना घडत असल्याची माहिती नागरिकांकडून मिळत असल्याने अचानक तपासणी मोहीम घेण्याचे आदेशही त्यांनी दिले.

महावितरणच्या सभागृहात सोमवारी सकाळी अकरा वाजता ही बैठक घेण्यात आली. बैठकीस आमदार संदीपान भूमरे,आमदार इम्तियाज जलील, उपजिल्हाधिकारी सोरमारे, नगरसेविका अंकीता विधाते,उपजिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड, गणू पांडे, अशोक पटवर्धन, एन बी कुलकर्णी मुख्य अभियंता सतिश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांनी वडगाव येथील थोरात यांच्या फॉर्म हाऊससाठी देण्यात आलेल्या डिपीवरून ७४ जळगाव पाणी पुरवठा योजनासाठी कनेक्शनच देण्यात येत नाही. यामूळे या फिडरची महावितरणचे तपासणी करावी अशी मागणी आमदार संदीपान भुमरे यांनी केली.

खुलताबाद तालुक्यातील नागरिकांनी गावातील वीजेच्याविविध समास्या मांडल्या. ठेकदारांनी अर्धवट कामे केली आहेत. पैठण रोडवरील महावितरणचे कामे अर्धवट सोडण्यात आलेली आहेत. ठेकेदारांनी हे कामे केलीच नाही. खांब हटविण्याचा प्रश्न प्रत्येक बैठकीत उपस्थित होतो.त्यावर काहिच उपाययोजना अधिकारी करत नाही.असे सांगत महाविरणच्या कामावर आमदार संदीपान भूमरे यांनी नाराजी व्यक्त केली. बी.व्ही.जी कंपनी शेतकऱ्यांकडून कामाचे पैसे वसुल करते. काही शेतकऱ्यांना आमच्याकडे तक्रार केली. या कंपनीसह सर्व ठेकेदाराच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी एक नोडल ऑफिसर नेमवा. आणि बी.व्हीजी. कंपनीची चौकशी करावीत. असे आदेशच जिल्हा विद्युतीकरण समितीचे अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले. ३१ डिसेंबरपर्यंत कन्नड विभागातील जळालेल्या सर्व डिपी दुरुस्त करण्यात येणार व क्रांती चौक येथे ग्राहक तक्रार निवारण केंद्र लवकरच उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्य अभियंता सतिश चव्हाण यांनी दिली.

चार महिन्यापुर्वी नागद जवळील सायगव्हाण गावच्या पुनम मधुकर सौदाणे या महिलेचा लाईनमन आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या चुकीमूळे विद्युत तारेमूळे मृत्यु झाला. तसेच तीन शेळया मृत्युमुखी पडल्या. या विषयी महावितरणने कोणतीच मदत दिली नसल्याचा प्रश्न संजय राजपूत यांनी उपस्थित केल्यानंतर पुढील महिन्यात मदत देण्यात येईल. २७ जानेवारीला होणाऱ्या बैठकीत ही मदत वाटप होणार असल्याचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत सांगितले.

ग्राहकांना उशीराने बील देणाऱ्या ठेकेदारावर होणार कारवाई करावी, २६ ठिकाणचे विजेच खांब त्वरीत हटवावे.आरेफ कॉलनीतील मंजूर पोल बसवावे.विष्णुनगरात एअरबंच केबल बसविण्यात यावेत. नागद, वैजापूर, गंगापूर, कन्नड परिसरातील मंजूर डिपी त्वरीत बसविण्यात यावी असे निर्देश खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत महावितरणला दिले. अधिक्षकअभियंता प्रभाकर निर्मळे, अशोक फुलकर, नारायण सुरे, श्रीरंग आमटे, शिवाजी शिंदे, अमित पुजारी यांच्यासह नागरिक यावेळी उपस्थित होते.

**प्रसिध्दी प्रमुख**

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525